बुलढाणा/परभणी/अकोला/वाशिम/जालना/संभाजीनगर/जालना/बीड/नाशिक/पुणे/ठाणे/मुंबई/यवतमाळ/अमरावती.

RNI - MAHMAR/२०२२/८७८८४

सोमवार ०१ डिसेंबर २०२५

# दैनिक सेवाशक्ती टाईम्स

आपल्या हक्काचे दैनिक

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

● वर्ष - ३ रे ● अंक - २६८ ● पाने - ४ ● किंमत - २ रुपये ●

## अकोट आणि तेल्हारा नगरपालिकेत भ्रष्टाचार!

### भाजपची सत्ता असलेल्या अकोट, तेल्हारा नगरपालिकेत भ्रष्टाचार झाल्याचा एकनाथ शिंदेचा आरोप

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



**भाजपची सत्ता असलेल्या अकोट, तेल्हारा नगरपालिकेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप !**

भाजपची सत्ता असलेल्या अकोट, तेल्हारा नगरपालिकेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप एकनाथ शिंदे यांनी केला आहे. तिन्ही लाडक्या बहिणींना नगराध्यक्ष करा, एकनाथ शिंदे यांचा मतदारांना आवाहन केले आहे. आपल्याला तिन्ही नगरपालिकावरील भ्रष्टाचार राज संपवायच आहे असे म्हणत शिंदेंनी भाजपाला टोला लगावला. (दरम्यान, अकोट आणि तेल्हारा नगरपालिकेत होता भाजपचा नराध्यक्ष आहे) शिवसेनेला विजय करा, तिन्ही नगरपालिकेला नगर विकास खात्यातून पाहिजे तेवढा निधी देऊ, असा शब्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी

अकोट : पायलटने अंधारामुळं हेलिकॉप्टर उडवण्यास नकार दिल्याने एकनाथ शिंदेंना अकोला जिल्ह्यातील हिवरखेड येथे होणारी सभा रद्द करावी लागली. यानंतर एकनाथ शिंदे यांनी फोनवरुन सभेला संबोधित केले. यावेळी त्यांनी मतदारांना सत्ता देण्याचे आवाहन केलं आहे. भाजपची सत्ता असलेल्या अकोट, तेल्हारा नगरपालिकेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही एकनाथ शिंदे यांनी केला. अकोला जिल्ह्यातील हिवरखेड येथे आज एकनाथ शिंदे यांची सभा रद्द करावी लागली. उदगीर येथील सभा आटोपून एकनाथ शिंदे अमरावती पोहोचले होतेय. तिथून ते हेलिकॉप्टरने हिवरखेडला येणार होते. मात्र, अंधार झाल्यामुळे हेलिकॉप्टर पायलटने उड्डाण भरण्यास स्पष्टपणे नकार दिला. त्यामुळे एकनाथ शिंदेंना हिवरखेडची सभा रद्द करत माघारी फिरावे लागले. आज एकनाथ शिंदे यांची हिवर खेड येथे अकोला जिल्ह्यातील पाच नगरपालिका आणि एका नगर पंचायती साठी सभा होती. यासाठी सभा असलेल्या हिवरखेड मध्ये शिवसेनेने जोरदार तयारी केली होती. मात्र, सभा रद्द झाल्यामुळे अखेर एकनाथ शिंदे यांनी फोनवरून सभेला संबोधित केलं. यावेळी त्यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिकां मध्ये शिव सेनेला सत्ता देण्याचा आवाहन मतदारांना केलं आहे. दरम्यान, या सभेत बोलतांना एकनाथ शिंदे यांनी जिल्ह्यातील या आधीच्या काळात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. अकोट, तेल्हारा या दोन्ही नगरपालिका भाजपच्या ताब्यात होत्या. त्यामुळे एकनाथ शिंदे यांनी थेट भाजपची सत्ता असलेल्या नगरपालिकांवर भ्रष्टाचाराचा आरोप करत एक प्रकारे भाजपवर हल्ला चढवलाय. त्यामुळं आता भाजपचे नेते या टीकेला नेमकं काय प्रत्युत्तर देणार हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे. भाजपची सत्ता असलेल्या अकोट, तेल्हारा नगर पालिकेत भ्रष्टाचार झाल्याचा आरोप एकनाथ शिंदे यांनी केला आहे. तिन्ही लाडक्या बहिणींना नगराध्यक्ष करा, एकनाथ शिंदे यांचा मतदारांना आवाहन केले आहे. आपल्याला तिन्ही नगर पालिकावरील भ्रष्टाचार राज संपवायच आहे असे म्हणत शिंदेंनी भाजपाला टोला लगावला.




## "कुंभमेळ्यासाठी सरकारने १८०० झाडं तोडण्याचा निर्णय घेतला"

### नाशिकमधल्या झाडं तोडण्याचा निर्णयावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आक्रमक

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**

मुंबई : आगामी कुंभमेळ्याचा पार्श्वभूमीवर राज्य सरकारनं नाशिकमध्ये जवळपास दोन हजार झाडं तोडण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र या निर्णयाला सर्वसामान्य नागरिकांसह विविध संघटनांकडून विरोध केला जात आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही आता या लढ्यात उडी घेतली असून वृक्षतोडीविरोधात लढणाऱ्या नाशिककरांना आपला पाठिंबा असल्याचं जाहीर केलं आहे. तसंच सरकारने झाडं तोडण्याचा निर्णय वेगळ्याच उद्देशातून घेतल्याची शंका राज यांनी सोशल मीडियावर लिहिलेल्या पोस्टमधून व्यक्त केली आहे. कुंभमेळ्यासाठी सरकारने १८०० झाडं तोडण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिकमध्ये कुंभमेळा हा काही पहिल्यांदा होत नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महापालिकेच्या सत्ताकाळात पण कुंभमेळा झाला. त्यावेळेला आम्ही शहरात भरपूर पायाभूत सुविधा उभारल्या. तेव्हा नगर सेवकांचा व प्रशासनाचा उत्तम संवाद होता, त्यामुळे कामं करताना जनतेला काय हवं आहे याचा विचार केला गेला. एकूणच नियोजन इतकं उत्कृष्ट होतं की तेव्हाच्या नगरसेवकांचे प्रतिनिधी म्हणून महापौरांचा आणि तत्कालीन प्रशासनाचे प्रतिनिधी म्हणून आयुक्तांचा थेट अमेरिकेत सत्कार झाला होता. आम्हाला या पायाभूत सुविधा उभ्या करताना कुठली झाडं तोडावी लागली नाहीत. मग आता या कुंभमेळ्या साठी झाडं का तोडावी लागत आहेत?" असा खरपूस सवाल राज ठाकरेंनी विचारला आहे.या लढ्यात तुम्ही ठाम राहा, असं आवाहन राज ठाकरे यांनी नाशिककरांना केलं आहे. ते म्हणाले की, "झाडं तोडून त्याची भरपाई म्हणून दुसरीकडे झाडं लावली जातील, असली पोकळ आश्वासनं सरकारने देऊच नयेत कारण असं कधी होत नाही. सरकारकडे जर दुसरीकडे पाचपट झाडं लावायला जागा आहे तर मग तिकडेच साधुग्राम करा. सरकारने साधूंच्या नावाखाली उद्योग पतींच्या घशात काहीतरी टाकण्याचा संधिसाधूपणा करू नये. काही कोटी झाडं लावल्याची घोषणा भाजप सरकारने काही वर्षांपूर्वी केली होती, जी झाडं कुठे दिसली नाहीत. नाशिककरांचा या वृक्षतोडीला तीव्र विरोध आहे. नाशिकरांना माझं आवाहन आहे की तुम्ही ठाम रहा, तुमच्या पाठीशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना उभी राहील. यामध्ये खरंतर कोणतेच राजकारण नाही , या आता होणाऱ्या निवडणुकांनंतर देखील आमचा या वृक्षतोडीला विरोधच राहील ! माझं सरकारला आवाहन आहे की उगाच संघर्ष वाढवू नका. लोकांचं काय म्हणणं आहे त्याचा कधीतरी आदर राखला जाईल असं पाहा. तरीही सरकारने संघर्षाची भूमिका घेतली तर जनतेच्या बरोबर या लढ्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आहेच आणि असेलच," असा शब्द राज ठाकरे यांनी नाशिककरांना दिला आहे.

#### राज ठाकरे यांची पोस्ट जशीच्या तशी...!

आगामी कुंभमेळ्यासाठी सरकारने १८०० झाडं तोडण्याचा निर्णय घेतला आहे. नाशिकमध्ये कुंभमेळा हा काही पहिल्यांदा होत नाहीये. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महापालिकेच्या सत्ताकाळात पण कुंभमेळा झाला. त्यावेळेला आम्ही भरपूर पायाभूत सुविधा उभारल्या. त्यावेळच्या नगरसेवकांचा आणि प्रशासनाचा उत्तम संवाद होता, त्यामुळे कामं करताना जनतेला काय हवं आहे याचा विचार केला गेला. एकूणच नियोजन इतकं उत्कृष्ट होतं की तेव्हाच्या महापौरांचा,नगरसेवकांचे प्रतिनिधी म्हणून आणि तत्कालीन आयुक्तांचा, प्रशासनाचे प्रतिनिधी म्हणून, थेट अमेरिकेत सत्कार झाला होता. आम्हाला या पायाभूत सुविधा उभ्या करताना कुठली झाडं तोडावी लागली नाहीत. मग आत्ता या कुंभमेळ्यासाठी झाडं का तोडावी लागत आहेत ?

#### मग तिकडेच झाडं लावा ना..!

बरं ही झाडं तोडून त्याची भरपाई म्हणून दुसरीकडे झाडं लावली जातील, असली पोकळ आश्वासनं सरकारने देऊच नयेत कारण असं कधी होत नाही. आणि सरकारकडे जर दुसरीकडे पाचपट झाडं लावायला जागा आहे तर मग तिकडेच साधुग्राम करा. सरकारने साधूंच्या नावाखाली उद्योगपतींच्या घशात काहीतरी टाकण्याचा संधिसाधूपणा करू नये. आणि काही कोटी झाडं लावल्याची घोषणा भाजप सरकारने काही वर्षांपूर्वी केली होती, जी झाडं कुठे दिसली नाहीत. असो. आज कुंभमेळ्याचं कारण दाखवून झाडं तोडायची, साधूंच्या नावाने ती जमीन सपाट करून घ्यायची आणि मग नंतर पुढे ती आपल्या लाडक्या उद्योगपतीला दान करायची ! इतकाच विचार या सरकारचा असणार ! नाहीतरी सध्या महाराष्ट्रात दुसरं काय सुरु आहे ? जमिनी गिळणं नाहीतर उद्योगपतींचे दलाल म्हणून काम करणं हेच सध्या सत्ताधारी मंत्री, आमदार , त्यांचे नातेवाईक आणि त्यांची वर्तुळं करताना दिसतायत !

#### नाशिकरांना राज ठाकरे यांनी केले आवाहन!

नाशिककरांचा या वृक्षतोडीला तीव्र विरोध आहे. नाशिकरांना माझं आवाहन आहे की तुम्ही ठाम रहा, तुमच्या पाठीशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना उभी राहील. यामध्ये खरतर कोणतेच राजकारण नाही , या आत्ता होणा-या निवडणुकांनंतर देखील आमचा या वृक्षतोडीला विरोधच राहील ! माझं सरकारला आवाहन आहे की उगाच संघर्ष वाढवू नका. लोकांचं काय म्हणणं आहे त्याचा कधीतरी आदर राखला जाईल असं पहा.तरीपण सरकारने संघर्षाची भूमिका घेतली तर जनतेच्या बरोबर या लढ्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आहेच आणि असेलच ! असं राज ठाकरे यांनी त्यांच्या पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

## तीन गोळ्या झाडल्या तरी तो जिवंत होता! मग भावांनी...!; सक्षमसोबत नेमकं काय घडलं? नांदेडची थरकाप उडवणारी घटना

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



नांदेड : संपूर्ण महाराष्ट्राला हादरुक टाकणारी घटना समोर आली आहे. नांदेडमध्ये एका आंतरजातीय प्रेमाला विरोध करताना तरुणीच्या वडिलांनी थेट मुलाची हत्या केली आहे. मुलाची हत्या करण्यासाठी त्यांनी पोटच्या दोन मुलांची मदत घेतली. या सगळ्या प्रकरणानंतर तरुणीने पोलिसात धाव घेत वडील आणि भावांविरोधात तक्रार केली आहे. तसेच तिने तिघांनाही फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली आहे. आता प्रकरण नेमकं काय आहे चला जाणून घेऊया...

**तीन वर्षांपासून प्रेम, पण जातीमुळे जीव घेतला!**

२५ वर्षीय सक्षम ताटे आणि २१ वर्षीय आंचल मामीडवार यांच्यात गेल्या तीन वर्षांपासून प्रेमसंबंध होते. आंचलच्या कुटुंबाला हे नाते मान्य नव्हते कारण दोघे वेगवेगळ्या जातीचे होते. आंचलच्या वडिलांचे नाव गजानन मामीडवार, तर दोन्ही भाऊ हिमेश आणि साहिल अशी नावे आहेत. या तिघांनीच सक्षमची हत्या केल्याचे आंचलने पोलिसांना सांगितले. आंचलच्या म्हणण्या नुसार, "सक्षमवर याआधी एमपीडीए (MPDA) लावण्यात आला होता. तो सुटून आल्यानंतर माझे वडील आणि भाऊ त्याला ठार मारण्याच्या मागे लागले होते. मला सतत धमक्या मिळत होत्या की, त्याला संपवणारच."

**गोळ्या झाडल्या तरी जिवंत होता, मग...!**

आंचलने घडलेला प्रकार सांगताना म्हटले की, "त्यांनी सक्षमला गोड बोलून भेटायला बोलावले. मग त्याच्यावर तीन गोळ्या झाडल्या. तीन गोळ्या लागूनही सक्षम जिवंत होता. शेवटी माझ्या भावांनी त्याच्या डोक्यात फरशी आणि जड वस्तूने वार करून त्याची हत्या केली."

**मृतदेहाशी लग्न आणि फाशीची मागणी!**

सक्षमच्या अंत्य संस्कारा पूर्वी आंचलने ठाम निर्णय घेतला. तिने सक्षमच्या पार्थिवाला हळद-कुंकू लावले, मंगळसूत्र घातले आणि त्याच्याशी औप चारिक लग्न केले. रडत रडत ती म्हणाली, "माझ्या वडिलांनी आणि भावांनी आमचे प्रेम हिरावले, पण ते हरले. सक्षम मेला तरी जिंकला. मी कुणाच्या दबावाखाली नाही. मी सक्षमची आहे आणि आयुष्यभर सक्षम चीच राहीन. माझ्या वडिलांना आणि दोन्ही भावांना फाशीची शिक्षा व्हावी हीच माझी इच्छा आहे." ही घटना समोर आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. सोशल मीडि यावर आंचलच्या धैर्याचे आणि प्रेमाच्या निर्धाराचे कौतुक होत आहे, तर कुटुंबाती लच लोकांनी केलेल्या या क्रूर कृत्याचा तीव्र निषेध केला जात आहे. सध्या तिघा आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## नाशिकमध्ये एकाच घरात सापडली चार जणांच्या बॉडी, व्हॉट्सअॅप स्टेटसला सगळ्यांचे फोटो ठेवत लिहिले दोन शब्द... धक्कादायक घटना समोर

**सेवाशक्ती टाईम्स.**
**वृत्त संकलन.**



देवळा : नाशिकमधील चांदवड तालुक्यातील दिघवडची घटना ताजी असतानाच फुलेमाळवाडी (ता.देवळा) येथील गोविंदा बाळकृष्ण शेवाळे (वय ४०) या युवकाने पत्नी आणि दोन लहान मुलांना संपवत स्वतः ही फाशी घेतल्याची धक्कादायक घटना समोर येत आहे. रविवार (ता.३०) रोजी सकाळी ही घटना उघडकीस आली. याचा अर्थ ही घटना रात्री घडली असल्याचे स्पष्ट आहे. गोविंदा शेवाळे यांनी हे टोकाचे पाऊल उचलण्यापूर्वी व्हॉट्स ॲपवर 'भावपूर्ण श्रद्धांजली' असे स्टेट्स टाकले होते. हे स्टेट्स शेवाळे यांच्या लहान भावाने पाहिले आणि त्याला काहीतरी अनुचित घडल्याची शंका आली. त्याने तात्काळ इतर नातेवाईकांना फोनद्वारे याची माहिती दिली. त्यानंतर शेवाळे कुटुंबीयांच्या निवासस्थानी गेल्यावर भयानक घटना उघडकीस आली. घटना स्थळी मोठी गर्दी जमा झाल्याने पोलिसांनी जमावाला नियंत्रित केले. हत्या की आत्महत्या याबाबतच्या कारणांचा शोध घेण्यासाठी फॉरेन्सिक टीम तपासणी करणार आहे.स्वतःच्या मृत्यूचे संकेत देणारा 'भावपूर्ण श्रद्धांजली' हा स्टेटस पाहिल्यानंतर, ही घटना पूर्वनियोजित असावी अशी शक्यता व्यक्त होत आहे. या दुर्दैवी घटनेत कोमल गोविंद शेवाळे (वय ३५), ख़ुशी गोविंद शेवाळे (वय ८), श्याम गोविंद शेवाळे (दीड वर्षे) यांचा बळी गेल्याने त्यांचेमृतदेह स्वतःच्या घरात आढळून आल्याची घटना आज सकाळी घडली आहे. यात युवक गोविंद शेवाळे याने स्वतः दोरीने फाशी घेऊन आत्महत्या केली असल्याचे दिसून येत आहे, तर पत्नी, एक मुलगी, एक मुलगा यांचा मृतदेह झोपलेल्या अवस्थेत असल्याचे प्रथम दर्शनी आढळून आले आहे. मात्र गोविंदाच्या सासरच्या लोकांनी तेथे येऊन मयत गोविंदाच्या भाऊ आणि आईस शिवीगाळ करून मारण्याचा प्रयत्न केला.पोलिसांनी संबंधितांना ताब्यात घेऊन देवळा पोलिसात हजर केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत देवळा ग्रामीण रुग्णालयात श व विच्छेदनासाठी देण्यात आले असून पुढील तपास देवळा पोलीस पोलीस निरीक्षक सार्थक नेहते यांच्यासह पोलीस घटनास्थळी उपस्थित असून अधिक तपासासाठी नाशिक विभागीय फॉरेन्सिक टीम उपस्थित होत आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# देवदूत!

"मॅडम, तुम्हाला निघायला अजून वेळ आहे?" हातात किल्ल्यांचा जुडगा घेऊन योगेश उभा होता.

"हो अरे, अजून किमान एखाद-दीड तास तरी लागेल. असं कर, तू जा. मी लॉक करुन घेईन." शलाका म्हणाली.

आज शनिवार होता. दर शनिवारी रात्री योगेश त्याच्या गावी जायचा अन सोमवारी पहाटे परत यायला निघायचा. त्याचं हे रुटीन सगळ्यांना माहिती होतं.

"पण आता सगळे घरी गेलेत. ऑफिस मध्ये कुणीच नाही. तुम्ही एकट्याच आहात. बाहेर केवढा अंधार पडलाय बघा." त्याच्या स्वरात काळजी होती.

"काही हरकत नाही. पण आज हे काम संपवायलाच हवं. तू निघ खरंच." योगेश किल्ली ठेऊन गेला. जातांना "लवकर जा मॅडम, भारी पाऊस पडणार आहे" म्हणायला विसरला नाही.

"तू नको काळजी करुस. जाईन मी व्यवस्थित. तू नीट जा." सांगितलेली अन कित्येकदा न सांगितलेलीही कामं समजून पटापट करणाऱ्या योगेश बद्दल तिला नेहमीच ममत्व वाटायचं.

खरंतर संध्याकाळी सहानंतर शलाकालाही ऑफिसमध्ये थांबायची इच्छा नव्हती. तिला नेहमी वेळेच्या आधी काम तयार ठेवायला आवडायचं. पण बाकी सगळ्यांकडून येणाऱ्या माहितीवर तिचं काम अवलंबून असल्यामुळे तिचा नाईलाज होता. तिला सगळयांचा राग येत होता. या लोकांचं हे नेहमीचंच आहे. कद्धी कद्धी म्हणून डेटा वेळेवर द्यायचा नाही. एरवी जरा मॅनेज करताही येतं. पण आता सोमवारी प्रेझेंटेशन आहे. सगळं कंपायलेशन आज व्हायलाच पाहिजे. त्यापुढे पॉवर पॉईंट......बराच वेळ जाणार. तिच्या लॅपटॉपचा स्क्रीन गेल्यामुळे तो मागच्याच आठवड्यात दुरुस्तीला दिला होता. तो रोज आज देतो उद्या देतो चालू होतं. नाहीतर हे काम घरी तरी केलं असतं. वेळच्या वेळी कामं केली तर काहीतरी शिक्षा होते , असं लोकांना वाटतं बहुतेक.

बाहेर दुपारी चार पासूनच अंधारून आलं होतं. चांगलाच पाऊस पडणारस दिसतंय. हवामान खात्यांनं कालपासून तीन दिवसांचा रेड अलर्ट दिला होता. पण काल कसलं लख्ख ऊन पडलं होतं.... "आता तीन दिवस तरी छत्री विसरायला हरकत नाही." नेहमीप्रमाणे कुणीतरी कॉमेंटही केली होती.

आज सकाळपासून सलग काम करता आलं असतं, तर किमान आतापर्यंत ते आटपत आलं असतं. पण मध्येच दोन तास चेअरमन सरांच्या बर्थडे कार्यक्रमात गेले. तेव्हा हातातलं काम थांबवणं आपोआप आलंच. आता भराभर करायला हवं. पाण्याची बाटली तोंडाला लावून परत तिनं कॉम्पुटरकडे नजर फिरवली.

काम संपवून तिनं बॅकअप घेतलं तेव्हा आठ वाजायला आले होते. बापरे! ती कामात एवढी बुडाली होती की, ना घड्याळाकडे लक्ष गेलं ना खिडकीकडे नजर टाकली. आता बघितल्यावर मात्र जरा टेन्शन आलं. सगळं आवरून ती खाली आली, तेव्हा पाऊस चांगलाच धुवांधार कोसळत होता.

"मॅडम, छत्री नाही आणली ?" रखवालदारानं विचारलं.

"आणली. पण गाडीत आहे."

"ही घ्या. मी येतो गाडीपर्यंत." त्याची जास्तीची छत्री घेऊन ती त्याच्याबरोबर पार्किंगकडे निघाली. पाऊसच एवढा वेडावाकडा येत होता, की मोठी छत्री असूनसुद्धा साडी खालूंन पूर्ण भिजली. गांवाबाहेर, मोकळ्यावर ही एकमेव इमारत होती. त्यामुळे वाराही नेहमीच खूप असायचा.

"२शी ! आज नेमकी साडी नेसायला लागली. कार्यक्रमाचा ड्रेसकोड होता नं !" ती चडफडली. साडी नेसली म्हणून रोजच्या सवयीच्या सॅंडल सोडून चपलाही हाय-हिल्स च्या घातल्या होत्या. आता दुपारपासून साठलेला राग उफाळून यायला लागला होता.

"दीर्घ श्वास घे....बी कूल....मोजून पंधरा मिनटतात तू घरी असशील ...." तिने स्वतःला बजावलं. तरी गेट बाहेर पडतांना मोठ्या खड्ड्यातून गेलीच गाडी.

घर सात-आठ किलोमीटर वर होतं. दिवसाउजेडी काही नाही पण आत्ता अंधार आणी धो-धो पाऊस. जरा जपून गाडी चालवायला लागणार होती. शिवाय पक्का रस्ता अजूनही झाला नव्हता. त्यामुळे खड्डे भरपूर. रोज लागणारे खड्डे इतके पाठ झाले होते, एक हात सतत गियर वरच असायचा.




नदीपलीकडच्या भागातली हि पहिली इमारत. आता हळूहळू डेव्हलपमेण्ट ला सुरवात झालीय, पण अजूनही रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी मुख्यतः पेरुच्या अन द्राक्षाच्या बागा आहेत. रस्त्याच्या कडेला दुतर्फा दाट झाडी आहे. कधीतरी या रस्त्यानं पायी चालायला काय छान वाटतं ! दोन तीन वेळा मैत्रिणींबरोबर ती रविवारची आलीही होती फिरायला. गाडी पलीकडच्या काठावर उभी केली आणि मस्त फेरफटका मारला होता. तेव्हा मैत्रिणींना कसला हेवा वाटला होता तिचा, एवढ्या छान जागी रोज यायला मिळतं म्हणून.

आता तोच निर्मनुष्य रस्ता भितीदायक वाटत होता. गुडुप्प अंधार अन धो-धो पाऊस . त्यात अर्धवट भिजलेली ती. गारव्याने हात कापायला लागले होते. मध्येच गाडीला परत गचका बसला. काहीही झालं तरी गाडी सेकंड गियर मध्येच ठेवायची, तिनं ठरवलं. जवळपास निम्म अंतर पार झालं होतं . आता हे पुढचं वळण घेतला की पुढे नदीपर्यंत अगदी सरळ जायचं. पोचू तिथपर्यंत दहा मिनिटात, तिनं स्वतःला धीर दिला.

वळण घेतेच आहे तर जोराचा धक्का बसून गाडी बंद पडली. शलाकाने किल्ली फिरवली. इंजिनचा कुठलाही आवाज येईना. भीती जरा वाढली. परत परत तिने दोन-तीनं वेळा प्रयत्न केला. पण गाडी ढिम्म. बहुतेक इंजिनमध्ये पाणी गेलेलं दिसतंय गाडी मोठ्या खड्ड्यातून गेली तेव्हा. बापरे! आता काय करायचं? देवाचा धावा करत थरथरत्या हातानी तिनं पर्स मधला फोन काढला. ज्याची भीती वाटत होती तेच झालं. फोनला रेंज नव्हती. ऑफिसच्या कंपाऊंड बाहेर पडल्यापासूनच नदीपर्यंत रेंज नसतेच कधी.

सुन्न होऊन काही वेळ ती तशीच बसून राहिली. काही सुचेचना. ती अगदी मध्यावर आली होती. पाऊस कोसळतच होता. गाडीत छत्री होती. मागं गेलं तर ऑफिसचा फोन वापरता येईल. पण फोन करून एवढ्या पावसात मेकॅनिक येणं अशक्य. शिवाय पुढंही तेवढंच अंतर शिल्लक होतं. या रस्त्यावर तर संध्याकाळी सात नंतर कुणी नसतं आणि या पावसात तर अजिबातच शक्यता नाही.

ती इथे अडकलीय हे कुणालाच कळणं शक्य नव्हतं. सारखा परगावी असणाऱ्या नवऱ्याचा तिला संताप आला. उद्या पहाटेच्या फ्लाईटने तो यायला निघणार होता. दुपारीच फोन येऊन गेला होता , मध्यरात्री एअरपोर्ट वर जायला लागणार म्हणून रात्री लवकर झोपणार म्हणाला होता. म्हणजे आता फोन यायची शक्यता नाही. एवढ्या पावसात तिची गाडी पार्किंग मध्ये नाही हे शेजाऱ्यांच्या लक्षात यायची पण शक्यता कमी होती. ऑफिसमध्ये तर आज सगळे समारंभाच्या मूड मध्येच घरी गेले होते. ती तिथे आहे हे कुणाच्या लक्षातही नव्हतं. चीड - संताप सगळं अनावर होत होतं. खरंतर बाकी सगळ्यांमुळे आज तिच्या कामाला उशिर झाला होता. तिला खूप - खूप रडू आलं. एवढं असहाय्य कधीच वाटलं नव्हतं तिला.

थोड्या वेळाने तिने स्वतःला सावरलं. रडून चिडून काहीच उपयोग नव्हता. जे काय करायचं ते तिला एकटीलाच करायला लागणार होत. अंधारा रस्ता एकटा आणि भितीदायक असला तरी कापायचा तिला एकटीलाच होता. छत्री आणी पर्स घेऊन ती खाली उतरली. मोबाईल चा टॉर्च लावला. नशीब, गाडी कोपऱ्यावर बंद पडलीय, रस्त्याच्या मधोमध नाही. कधीतरी व्हाट्सअप वर वाचलेली "तरी बरं ....." ची पोस्ट आठवली.

खांद्यावर पर्स लावली. एका हातात छत्री, दुसऱ्या हातात साडी अन उजेडाकरता लावलेला मोबाईल घेऊन घराच्या दिशेनं चालायला तिनं सुरवात केली. दहाबारा पावलं टाकल्यावरच लक्षात आलं , हे असं चालणं खूपच अवघड जातंय साडी अन हाय-हिल्स मुळे. ओलागच्च परकर पायांना अगदी चिकटून बसला होता. त्यावर ती कॉटन ची साडी. काय करावं बरं ? ड्रेस असता तर.....एकदम तिला आठवलं. धोब्याकडे इस्तरी ला द्यायला म्हणून कपड्यांचं गाठोडं मागच्या सीट वर ठेवलं होतं. करावा का त्याचा उपयोग? काय हरकत आहे? चालणं तेवढंच सोपं जाईल. आत्ता या बाजूला कुणी यायची शक्यता नाही. (उलट तसं असतं तर मदत तरी झाली असती.) शिवाय आपण घेऊ व्यवस्थित काळजी.

ती परत मागे वळली. गाडीत मागच्या सीटवर बसून गाठोडं सोडलं. त्याच कपड्याने आधी हातपाय कोरडे पुसून घेतले. मग त्याच कपड्याचं एक टोक रस्त्याच्या बाजूच्या खिडकीच्या वरच्या हॅन्डबार वर बांधलं. दुसरं टोक मागच्या सीटच्या हेडरेस्ट वर खुपसलं. पटकन एक हलक्या वजनाचा कुर्ता अन सलवार घेतली अन भरभर बदलायला सुरवात केली. कपडे ओले असल्यामुळे जरा अवघड गेलं, पण युक्ती सुचल्यामुळे जरा उत्साह आला होता.

कपडे बदलून ती खाली उतरली तेव्हा खरंच हलकं वाटायला लागलं तिला. चपलांचं काही करता येणं शक्य नव्हतं पण आता पर्स ,छत्री अन मोबाईल सांभाळणं सोपं जात होत. आडवा - तिडवा पाऊस अजूनही चालूच होता , आणि पाण्यातून सांभाळून चालायला लागत होत,पण आता तिच्या चालण्याला जरा गती आली होती.

दहाबारा मिनिट झाली असतील. मनात देवाचा धावा चालूच होता. (देवाचं एवढी आठवण पूर्वी कधी काढली बरं! एकीकडे मनाशी चाललेला संवाद.) अचानक समोरून हेड लाईट चमकले. एकाच वेळी भीती आणि मदत मिळण्याची जाणीव झाली. ती तशीच थांबली. मोटारसायकल तिच्या जवळ येऊन थांबली.

"मॅडम, तुम्ही? पायी ? गाडी कुठं आहे" रेनकोट मधून निथळत योगेश विचारत होता.

आनंदाच्या अन सुटकेच्या भावनेनी शलाकाला भरून आलं.

"गाडी कोपऱ्यावर बंद पडलीय. पण तू इथे कसा आता ?"

"गेलो होतो बसस्टॅन्ड वर. पावसामुळे एसटी रद्द झाली. मग वाटलं तुम्हाला फोन करावा . तुमचा फोन लागत नव्हता म्हणून गेट वर फोन केला तर रखवालदार म्हणाला मॅडम आठ वाजताच गेल्या. मला काळजी वाटली मग. म्हणून निघालो. "

कोण कुठला योगेश, देवदूतासारखा धावून आला. शलाकाच्या तोंडातून शब्द फुटेना.

"बरं , बसा आता मागे. तुम्हाला घरी सोडतो. पण ओल्या व्हाल बर का. तुमची छत्री काही कामाची नाही गाडीवर"

मागच्या सीटवर बसता बसता शलाकाच्या डोळ्यातलं पाणी पावसाच्या पाण्यात मिसळून गेलं.










दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# ३० वर्षे निस्वार्थ सैन्यसेवा पूर्ण करून सुभेदार महादेव धानोरे मातृभूमीत परतणार!

## देऊळगाव साकरशा गावात उत्साहाचे वातावरण सर्वत्र स्वागताच्या तयारीला वेग

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

देऊळगाव साकरशा : देऊळगाव साकरशा गावातील रहिवासी आणि भारतीय सेनेतील कोर ऑफ सिग्नल्सचे शूरवीर सुभेदार महादेव रामकृष्ण धानोरे हे तब्बल ३० वर्षांची निस्वार्थ, कर्तव्यनिष्ठ आणि पराक्रमी सेवा पूर्ण करून २ डिसेंबर २०२५ रोजी आपल्या मायभूमीत परत येत आहेत. त्यांच्या परतीनिमित्त गावात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि नातेवाईक अभिमानाने स्वागताच्या तयारीत व्यस्त आहेत. सुभेदार धानोरे यांनी भारतीय सैन्यात कार्यरत असताना जम्मू – काश्मीर, बंगाल, राज स्थान, पंजाब, गुजरात, गोवा, मध्य प्रदेश यांसारख्या अनेक संवेदनशील आणि कठीण राज्यांमध्ये उल्लेखनीय सेवा बजावली. देशाच्या उत्तरेकडील प्रचंड थंड हवामानापासून ते राजस्थानच्या उष्ण वाळवंटापर्यंत अगणित संकटांना सामोरे जात त्यांनी प्रत्येक परिस्थितीत सैनिकी कर्तव्याचे पालन प्रामाणिकपणे केले.त्यांनी बजावलेली ही ३० वर्षांची सेवा फक्त त्यांच्या साठीच नव्हे तर त्यांच्या पूर्ण कुटुंबा साठीही एक मोठी परीक्षा





होती. सैन्यातील सततची बदली, दर दोन ते तीन वर्षांनी नवीन ठिकाण, नवे वातावरण, मुलांच्या शिक्षणातील बदल, घरापासून दूर राहण्याचे दुःख या सर्वांना धैर्याने तोंड देत धानोरे कुटुंबाने देशसेवेत साथ दिली. गावातील नागरिक त्यांच्या योगदाना बद्दल भावपूर्ण कृतज्ञता व्यक्त करीत आहेत. देशा साठी आयुष्यभर सेवा देणाऱ्या वीराला आपण काय सन्मान करू? असा प्रश्न अनेक गावकऱ्यांच्या कंठातून ऐकू येतो. त्यांच्या परतीनंतर गावात त्यांचे भव्य स्वागत करण्याची तयारी जोमात सुरु आहे. सुभेदार धानोरे यांनी आपल्या सेवाकाळात शिस्त, निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाचा उच्च आदर्श ठेवला. त्यांच्या सेवेमुळे केवळ देऊळ गाव साकरशा नव्हे तर संपूर्ण तालुक्याला अभिमान वाटावा असे गौरवमय योगदान त्यांनी दिले आहे. ग्रामस्थांच्या मते देश रक्षणाची जबाबदारी अतिशय पवित्र; आणि ही जबाबदारी ३० वर्षे निभावणे म्हणजे अविश्व सनीय कामगिरी. त्यांच्या निवृत्ती नंतरही गावातील युवकांसाठी ते निश्चयाने प्रेरणादायी ठरणार आहेत. गावातील सर्व नागरिक, सामाजिक संस्था, मित्रमंडळी आणि नातेवाईकांनी सुभेदार महादेव धानोरे यांच्या पुढील आयुष्याला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत आणि त्यांच्या सेवाभावाला सलाम केला आहे.एकूणच, देशासाठी तीन दशके कार्य करणाऱ्या या वीरपुत्राच्या पुनरागमनाने देऊळ गाव साकरशा गावात स्नेह, अभिमान आणि उत्साहाचे वातावरण अधिकच उजळून निघाले आहे.

# निवडणूक कामाची लगबग सुरू प्रशासनाची तयारी पूर्ण आज मतदान बूथ केंद्रावर होणार रवाना

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अहेमद अन्सारी.**




पाथरी/परभणी : नगर परिषद पाथरी सार्वत्रिक निवडणूक कामाची लगबग सुरु असून निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती अरुणा संगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी श्री युवराज पौळ, श्री कृष्णा देशमुख, श्री प्रज्ञावंत कांबळे यांच्या सहकार्याने प्रशासनाने आवश्यक ती कामे पूर्ण करून तयारी पूर्ण केली आहे आज १ डिसेंबर रोजी शहरातील सर्व ३८ मतदान केंद्रावर झोनल अधिकारी यांच्या देखरेख खाली मतदान बूथ जीप द्वारे रवाना होणार आहेत.यासाठी मतदान केंद्रावर कर्मचाऱ्यांसाठी सर्व सुविधा उपल करून देण्यात आल्या आहेत आवश्यक तो पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे यासाठी मतदान साहित्य वाटप व स्वीकृती साठी स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. आज बूथ वर नियुक्त कर्मचाऱ्यांसाठी तिसऱ्या प्रशिक्षणाचे आयोजन ही करण्यात आले आहे या नंतर मतदान केंद्रावर नेण्या साठी साहित्य वाटप केले जाईल. सर्व कर्मचाऱ्यांसाठी निवडणूक विभागातर्फे भोजन व्यवस्था ही केलेली आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती अरुणा संगे वार यांनी दिली.

# सुदर्शन राठोड ची इसरो च्या विशेष शैक्षणीक विमान वारी करिता निवड

## जिल्ह्यात वरखेड गावाचे नाव चमकले

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अनिस शेख.**



महान : बार्शीटाकळी तालुक्यातील आणि महान येथून अगदी जवळच असलेल्या वरखेड खुर्द येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक केंद्रीय शाळा वरखेड खुर्द येथील प्रतिभावान विद्यार्थी चि.सुदर्शन संजय राठोड इयत्ता सहावी याची भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रो येथे अकोला जिल्हा परिषदेद्वारे आयोजित विमान वारी निवड चाचणीत जिल्ह्या मधून प्राविण्य क्रम मिळवत इस्रोच्या विशेष शैक्षणिक वारीसाठी त्याने जिल्ह्याच्या यादीमध्ये आपले स्थान निश्चित करून वरखेड गावाच्या गौरवामध्ये मानाचा तुरा रोवला. त्याची ही गगन भरारी शाळेतील इतर विद्यार्थ्यांसाठी अतिशय प्रेरणादायी ठरली आहे. वरखेड गावासाठी ही बाब अत्यंत अभिमानाची बाब आहे. या निवड चाचणीमध्ये जिल्ह्यातून एकूण २१० विद्यार्थी सहभागी झाले होते. या चाचणीमध्ये विज्ञान आणि गणित विषयावर विद्यार्थ्यांची निवड चाचणी घेण्यात आली होती. या निवड चाचणीत वरखेड जिल्हा परिषद केंद्र शाळेतील दोन विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यामध्ये चि. प्रणव महावीर तपसी आणि चि.सुदर्शन संजय राठोड यांनी सहभाग घेतला होता. जिल्हा स्तरीय निवड चाचणीत सुदर्शन संजय राठोड या विद्यार्थ्याने कठोर अभ्यास व दांडगा आत्मविश्वास आणि चिकाटीच्या जोरावर शाळेतील विज्ञान व गणित शिक्षिका कु. कल्पना पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनात दैदीप्यमान यश संपादन केले आहे. या विमान वारीमध्ये विद्यार्थ्यांना इस्रोच्या विविध प्रकल्पांचे प्रात्यक्षिक बघायला मिळणार आहे. रॉकेट व सॅटेलाइट निर्मिती प्रक्रियेची माहिती मिळेल, तसेच या विद्यार्थ्यांना तेथील शास्त्रज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळेल. अवकाश विज्ञानातील अद्यायावत प्रयोगशाळा आणि रा ॅकेट व उपग्रहाच्या लॉंचिंग स्टेशनची भेट घेण्याची देखिल संधी मिळणार आहे. ही वारी त्यांच्यासाठी विज्ञान जगताकडे नेणारी प्रेरणादायी वाट ठरणार आहे. शाळेतील सर्व शिक्षक, पालक वर्ग, शाळा व्यवस्थापन समिती मित्र मंडळी आणि गावकऱ्यांमध्ये या विद्यार्थ्यांचे खूप कौतुक होत आहे. निवड चाचणी निकाल लागला तेव्हा पासून समाज माध्यमातून सुदर्शन या विद्यार्थ्यांवर सुभेच्छांचा अविरत वर्षाव होत आहे.त्याच्या यशाच्या सन्मानार्थ शाळा व्यवस्थापन समिती तथा सरपंच उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य केंद्राचे केंद्रप्रमुख श्री बबन नांदे साहेब तथा बार्शीटाकळी पंचायत समिती चे शिक्षण विस्तार अधिकारी श्री प्रमोद जानोरकर सर तसेच शाळेतील मुख्या ध्यापक तथा शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांचे मार्फत भव्यदिव्य अभिनंदन समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सुदर्शन संजय राठोड या विद्यार्थ्याने गावाचा नाव लौकिक वाढविल्याबद्दल गावचे प्रतिष्ठित नागरिक श्री चंद्रसिंग भाऊ राठोड यांच्यातर्फे त्याला विमान वारीसाठी ट्रॅव्हल बॅग बक्षीस देण्यात आली. कार्यक्रमा चे अध्यक्ष पद गावच्या प्रथम नागरिक सौ. वर्षाताई चंद्रसिंग राठोड यांनी भूषविले तर या कार्यक्रमा साठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. मंगेश भाऊ विजयसिंग चव्हाण, सदस्य श्री.श्रावण चव्हाण ज्ञानेश्वर राठोड, सोपान काकणे,सौ. राजनंदिनी मंगेश चव्हाण श्री.सतीश जाधव श्री. गजानन घुगे, समिती उपाध्यक्ष श्री. शंकर आंधळे इत्यादीचे सहकार्य लाभले तसेच या कार्य क्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री.महादेव बहादरे, श्री.अविनाश आडे श्री. दीपक राठोड श्री.स्वराज राठोड श्री.सतीश जाधव श्री.नारायण चव्हाण श्री. संतोष शेलकर श्री. ज्ञानेश्वर काकडे, श्री. सुनिल जाधव इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते या कार्य क्रमाचे सुत्रसंचलन सहाय्यक शिक्षक सहायक श्री. समाधान जावळे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे व्यवस्थापन विज्ञान शिक्षका कु. कल्पना पवार मॅडम व कु.बेबी हजारे मॅडम यांनी पाहिले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे मुख्या ध्यापक श्री शिवशंकर गिरे यांनी केले.

# अमोल अंधारे यांचे भाजपा प्रदेशाध्यक्षांना नाराजीचे पत्र

## नगरपरिषद निवडणुकीसाठी दिलेला शब्द पाळला नसल्याचा उल्लेख



**सेवाशक्ती टाईम्स.**
**संदीप राठोड.**

खामगाव : भाजपाचे जिल्हा चिटणीस अमोल अंधारे यांनी २८ नोव्हेंबर रोजी प्रदेशाध्यक्षांना मेहकर येथील जाहीर सभेप्रसंगी पत्र दिले आहे. यामध्ये २०२४ च्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी दिलेला शब्द पाळला नाही, या व इतर मुद्द्यांचा उल्लेख या पत्रात करण्यात आला आहे. विधान सभा निवडणुकीच्या वेळी खामगाव मतदार संघातून उमेदवारी मागे घ्यावी. यासाठी पक्ष आपला विचार करेल तुम्ही भेटायला या, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आप ल्याला दिला होता. परंतु निवडणुकी नंतर जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी किंवा आमदार यांनी माझी भेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसोबत घडवून आणली नाही. तर न. प. निवडणुकीत उमेदवारी बाबतचा दिलेला शब्द पाळला नाही. तसेच खामगाव नगराध्यक्ष पदाची उमेदवारी मिळावी यासाठी आपण मुलाखत दिली होती. परंतु नगराध्यक्षपदाचा उमेदवार जाहीर करतांना झालेल्या बैठकीला मला बोलाविले नाही. या व इतर प्रकारचे अनेक मुद्दे या पत्रात नमूद आहेत. अशी माहिती अमोल अंधारे यांनी दिली आहे.

# ठाणे मनपाकडून पाणी बिलावर प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अमित जाधव.**




ठाणे : महापालिका कार्य क्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळ संयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह एक रकमी भरणा केल्यास प्रशास कीय आकारा मध्ये (दंड / व्याज) १०० टक्के सूट लागू करण्यात आली असल्याची माहिती महा पालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी आज दिली. थकीत पाणीपट्टी बिलावर १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे. ठाणे महापालिकेने पाणीपट्टी वसुलीची मोहिम हाती घेतली असून जे नागरिक पाणापट्टी भरणार नाही अशा थकीत बिलधार कांचे नळसंयोजन खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, तरी नागरिकांनी पाणीपट्टी भरुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सोरभ राव यांनी केले आहे. सदर योजना दि. १ डिसेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारा मध्ये (दंड / व्याज) १०० टक्के सूट / सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही. जे नागरिक दि. ३१ / ०३ / २०२६ आपली थकबाकीची रक्कम प्रलंबित ठेवतील अशा खातेदा रांवर जप्ती कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन नळ संयोजन खंडीत करणे, मिटर रुम सिल करणे व पंप जप्ती अशी कारवाई होईल असे आयुक्त यांनी यावेळी नमूद केले. या योजनेची प्रभावी पणे अंमल बजावधी होणेसाठी प्रभाग समिती स्तरावर माहिती फलक लावण्यात यावेत व सदर योजना प्रभावीपणे राबवावी अशी सूचना आयुक्तांनी केली आहे. या योजनेचा लाभ जास्तीत नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महा पालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी केले आहे.

# बार्शीटाकळी तालुक्यात काँग्रेस पक्षाला मोठे भगदाळ

## शिवसेना नेते आमदार बाजोरिया यांचे उपस्थितीत सरपंच महेंद्र पाटील गाढवे व त्यांच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**




बार्शीटाकळी : शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा समन्वयक आदरणीय शिवसेना नेते जिल्हा समन्वयक माजी आमदार श्री गोपीकिशन बाजोरीया साहेब, माजी आमदार श्री विपुल बाजोरीया व शिवसेना जिल्हा प्रमुख चंद्रकांत पांडे गुरुजी, जिल्हा प्रमुख आशिष भाऊ नवले, तालुका प्रमुख सचिन गालट यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये काँग्रेसला बाय-बाय करत शिवसेना शिंदे गटामध्ये मध्ये जाहीर प्रवेश केल्यामुळे काँग्रेस पक्षाला बार्शी टाकळी तालुक्यात फार मोठे भागदार पडले असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे, अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीचे महासचिव व धाकली गावचे मा.आदर्श सरपंच अकोला जिल्हा सरपंच संघटना जिल्हाध्यक्ष व सेवा सहकारी सोसायटी धाकली अध्यक्ष श्री महेंद्र पाटील गाडवे ग्रामपंचायत सदस्य व सेवा सोसा यटीचे संचालक श्री. राजेश इंगोले गजानन इंगोले, रत्नपाल जाधव, धाकली सेवा सहकारी सोसायटी संचालक गजानन गाढवे, गणेश गोरे,मंगेश शिंदे, ओंकार शिंदे,व मित्र मंडळी रामदास कदम, वसुदेव टाले, सोनू गिरे, बबलू तपासे, प्रमोद कायंदे, शंकर बोथे, विजय गाढवे, सदाशिव शिंदे, व इतर कार्य कर्त्यांनी शिवसेना शिंदे गटांमध्ये जाहीर प्रवेश केला आहें. जिल्ह्यात व तालुक्यात काँग्रेसला खूप मोठी खिंडार पडली असल्याचे दिसते, प्रामाणिक कार्यकर्ता प्रामाणिक व्यक्ति मत्व, असलेले महेंद्र पाटील गाडवे व यांची टीम यांनी शिव सेनेमध्ये जाहीर प्रवेश केल्या मुळे काँग्रेसमध्ये खूप मोठी पोकळी निर्माण झाली, सरपंच महेंद्र पाटील गाढवे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी शिंदे गट शिवसेनेमध्ये प्रवेश केल्यामुळे त्यांचे अनेकांनी अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# मेहकरमध्ये किशोर गारोळे लाट उसळली! नगराध्यक्षपदासाठी शहरवासीयांचा अभूतपूर्व पाठिंबा

## 'मशालचा' प्रकाश घराघरात!





किशोर गारोळे नगराध्यक्ष झाल्यानंतर असा बदलणार मेहकर शहरमजबूत व दर्जेदार रस्त्यांची निर्मितीदररोज नियमित स्वच्छता व कचरा व्यवस्थापनऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांचे संवर्धनअत्याधुनिक, सर्वसुविधायुक्त स्मशानभूमीगोरगरिबांसाठी हक्काची घरकुले२४ तास नळाला शाश्वत व नियमित पाणीपुरवठाघरकुल लाभार्थ्यांना पीआर कार्ड व नव्या घरकुलाची हमीनदी परिसराचा विकास करून पर्यटनस्थळात रुपांतरणसर्व रस्त्यांवर पथदिव्यांची उभारणीमुस्लिम बांधवांसाठी सरकारी शादीखानासर्व तरुणांना रोजगाराची हमीन.प. शाळांचे दुरुस्ती, रंगरंगोटी व अत्याधुनिकरणशाळांची देखरेख यंत्रणा आणि बहुभाषिक कौशल्य प्रशिक्षणमेहकरमध्ये भव्य ऑडिटोरियम उभारणी सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढविणेप्रत्येक प्रभागात सुंदर उद्यानेमहापुरुषांच्या स्मारकांचे नूतनीकरण व सुशोभीकरण शहरातील मुख्य चौक आकर्षक रोषणाईने उजळविणे.

आज निघणार भव्य रॅली आमदार कार्यालय ते नगरपरिषद उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार किशोर गारोळे, तसेच नगरसेवक नगरसेविका उमेदवारांच्या प्रचारार्थ उद्या दुपारी ४ वाजता आमदार सिद्धार्थ खरात यांच्या कार्यालयापासून नगरपरिषदपर्यंत भव्य रॅली काढण्यात येणार आहे.यानंतर सायंकाळी ६ वाजता ज्येष्ठ नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विशाल प्रचारसभा होणार आहे.या कार्यक्रमाला लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती केली आहे.

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मेहकर प्रतिनिधीं.**

मेहकर : आगामी मेहकर नगर परिषद निवडणु कीत नगराध्यक्ष पदाची निवडणूक चांगलीच रंगत घेत असून, या निवडणुकी तील सर्वाधिक चर्चेचा विषय एकच – किशोर गारोळे नगरा ध्यक्ष होणार की किती हजार मताधिक्याने होणार! उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार असलेल्या किशोर गारोळे यांच्या शांत, सोज्वळ, सुस्वभावी व्यक्तिमत्त्वा मुळे शहरवासीयां मध्ये मोठा विश्वास निर्माण झाला आहे. मेहकर शहरात सुरुवाती पासूनच मशाल चिन्हाचा प्रचंड जोर असून, ते शेवटपर्यंत टिकून राहणार असल्याची खात्री नागरिक व्यक्त करीत आहेत. विशेष म्हणजे, जनतेने स्वतःहून निवडणुकीची सूत्रे हाती घेतली आहेत. किशोर गारोळे जिंकणारच या भावनेने शहरात वातावरण भारलेले आहे. किशोर गारोळे यांचा साधा, सरळ स्वभाव, माणुस कीची नाळ, सर्व सामान्यां प्रती असलेला जिव्हाळा, मैत्री जपण्याची क्षमता आणि विविध क्षेत्रातील लोकांना उभे करण्यासाठी केलेले योगदान यामुळे ते जनतेच्या मनात स्थान निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत.शहरात सर्वत्र हीच चर्चाआपल्या घरातीलच व्यक्ती नगराध्यक्ष लढवत आहे; त्यांना जिंकवणे आपले कर्तव्य आहे. गत निवडणुकीत त्यांचे वडील भास्करराव गारोळे यांचे स्वप्न अल्प मतांनी अधुरे राहिल्याची खंत मेहकरकरां मध्ये आजही आहे. याच भावने तून यंदा अनेकजण अधिक जोमाने प्रचारात उतरलेले दिसत आहेत. स्थानि कांच्या मते, किशोर गारोळे हे नगराध्यक्ष झाले तर मेहकर शहराचा चेहरा मोहरा बदलून जाईल, विकास कामांना गती मिळेल आणि रोज गाराच्या संधी वाढतील. त्यांच्या नेतृत्वात शहर सर्वसमावेशक विकासा कडे जातील, असा विश्वास खूप मोठ्या प्रमाणात व्यक्त केला जात आहे.

# नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक कामगारांना मतदानासाठी भरपगारी सुट्टी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मेहकर प्रतिनिधीं.**



बुलढाणा : जिल्ह्यातील नगर परिषद व नगरपंचायातींच्या सार्वत्रिक निवडणू कीचा कार्य क्रम जाहिर झाला आहे. कार्यक्रमा नुसार निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मंगळ वार, दि. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. नागरिकांना हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे मतदा नाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. जिल्ह्यातील ११ नगरपरिषदांच्या निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात कामगारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी द्यावी, अशा सूचना सरकारी कामगार अधिकारी म. तु. जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिले आहे. उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या दि. २८ नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णया नुसार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, हॉटेल इत्यादी ठिकाणी काम करणारे कामगार व कर्मचारी मतदारांना मत दानाच्या दिवशी मतदान करण्याकरीता भरपगारी सुट्टी देण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल. तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्या साठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील. मतदानासाठी सुट्टी किंवा पूर्वपरवानगीने सवलत न दिल्यास आस्थापना धारका विरुद्ध कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. तरी बुलडाणा जिल्ह्यातील सर्व कामगार मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, याकरीता सर्व प्रकारच्या आस्थापना धारकांनी भरपगारी सुट्टी द्यावी, असे आवाहन सरकारी कामगार अधिकारी म. तु. जाधव यांनी केले आहे.

# दिवा पोलीस चौकी येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अमित जाधव.**



ठाणे/दिवा : मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील दिवा पोलीस चौकी येथे 'पब्लिक स्कूल, दातिवली (दिवा)' या शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन आणि चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यां मध्ये कायद्याची समज वाढावी आणि सुरक्षितते विषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने शाळेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि शिक्षकांना पोलीस चौकीत निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहायक पोलीस निरीक्षक (API) प्रवीण सुरवाडे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनचे कामकाज कसे चालते, याबद्दल सविस्तर माहिती दिली.यावेळी अनेक महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले सायबर क्राईम व ऑनलाईन फ्रॉड, इंटरनेटचा वापर करताना घ्यायची काळजी, गुड टच आणि बॅड टच बद्दल सुरक्षिततेच्या दृष्टीने जागृती, डायल ११२ (Dial ११२) आपत्कालीन मदतीसाठी संपर्क कसा करावा, तसेच अमली पदार्थ विरोधी जनजागृती व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम तसेच कार्य क्रमाच्या शेवटी प्रश्नोत्त रांच्या तासात विद्यार्थ्यांच्या मनातील शंकांचे आणि प्रश्नांचे निरसन API श्री. सुरवाडे यांनी केले. प्रसंगी गोपनीय अंमलदार श्री. रवि सातपुते, पोलीस अंमलदार पडवळे तसेच शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. विनोद पाटील सर, शिक्षिका रविना मॅडम, कृतिका मॅडम आणि सुमारे ५० ते ६० विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

# श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागममध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

## मानवता रक्षणासाठी श्री.गुरू तेग बहादूर यांचे बलिदान प्रत्येकाला प्रेरणा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अकोला प्रतिनिधीं.**



अकोला : 'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर' यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. जानेवारीमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन नांदेड येथे करण्यात आले आहे.तर ७ डिसेंबर रोजी नागपूर येथे मुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्य नाथ यांच्या उपस्थितीत'हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागमचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राज्यस्तरीय समितीच्या वतीने करण्यात आहे. राज्य समिती, स्थानिक समिती व समाज बांधवांच्या उपस्थितीत बैठक नियोजनभवनात झाली.यावेळी राज्य समितीचे किसनराव राठोड, महंत जितेंद्र महाराज,महंत सुनील महाराज यांच्यासह नंदू पवार अभिमान महाराज, गुरुमितसिंग गोसल, सुरजीतसिंग अकाली, लताताई राठोड,प्रकाश गोगलिया, हरीश पारवानी, सदाशिव चव्हाण आदी उपस्थित होते. श्री गुरु तेग बहादूर हे शीख समाजाचे नववे गुरु आहेत. मानवा धिकारांच्या सुरक्षे साठी कार्य करताना ते शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, मानवता, करुणा आणि धैर्य या मूल्यांचा संदेश दिला. त्यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्ष निमित्त महाराष्ट्र शासन आणि हिंदी दी चादर श्री गुरु तेग बहादूर ३५० व्या शहिदी समागम राज्यस्तरीय समितीच्या संयुक्त विद्यमाने ७ डिसेंबर रोजी नागपूर,२१ डिसेंबर रोजी नवी मुंबई तर जानेवारीमध्ये नांदेड कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गुरु तेग बहादूर यांच्या कार्याचा आणि हौतात्म्याचा इतिहास सर्वदूर विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून पोहोच विण्यात येणार आहे. तहसील, शहर जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात श्री गुरु तेग बहादूर यांच्या हौतात्म्याचा इतिहास सर्वांपर्यंत पोहचावा.या गौरवशाली इतिहासाच्या स्मृती सोहळ्या निमित्त शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोहयाल, सिंधी समाजाचे गुरुबंधुत्व नाते अधिक दृढ होणार आहे.श्री गुरु तेग बहादूर यांची शहादत व योगदान हे धर्म आणि मानवतेच्या रक्षणाचे तेजस्वी प्रतीक आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या शौर्याचा आणि श्रद्धेचा गौरव करण्यात येणार आहे.या कार्यक्रमामुळे गौरवशाली, पराक्रमी आणि धर्मनिष्ठ इतिहासाला नवे बळ मिळणार असून गुरुबंधुत्वाचा हा पवित्र वारसा पुढील पिढ्यांसाठी प्रेरादायी ठरणार आहे.

# सावत्रा येथे 'तपपूर्ती सोहळा व गुरूचरित्र पारायण' आणि 'संगीत रामचरितमानस कथा' चा भक्तीमय शुभारंभ!

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मेहकर प्रतिनिधीं.**




मेहकर : श्री संत रामजी महाराज संस्थान, सच्चिदानंद आश्रम, सावत्रा (ता. मेहेकर, जि. बुलढाणा) येथे गुरुवार, दि. ०४ डिसेंबर२०२५ पासून आठवडाभर चालणाऱ्या 'तपपुर्ती सोहळा यात्रा महोत्सव' व 'श्री गुरुहेतु हरिनाम सप्ताह' ला उत्साहात सुरुवात झाली आहे. या महोत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्तीमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.हा महोत्सव गुरुवार, दि. ०४ डिसेंबर ते गुरुवार, दि. ११ डिसेंबर२०२५ पर्यंत सुरु राहणार आहे.महाराजांच्या १२ वर्षांच्या समाजकार्याची तपपूर्तीया संपूर्ण सोहळ्याला संस्थानचे प्रमुख आणि प्रसिद्ध संत रामायणाचार्य प. पु. श्री. दिगंबर स्वामी अमोला नंदजी महाराज गिरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.या वर्षीच्या सोहळ्याचे एक विशेष महत्त्व म्हणजे, परमपूज्य अमोलानंदजी महाराज यांच्या कार्याला सावत्रा या ठिकाणी १२ वर्षे पूर्ण होत आहेत. या १२ वर्षांच्या कालावधीत महाराजांनी केवळ धार्मिक अनुष्ठानच नाही, तर आजूबाजूच्या परिसरातील अनेक नागरिकांचे व्यसन सोडवून त्यांना नशा मुक्तीचे मोलाचे मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या या प्रेरणेमुळे आणि मार्गदर्शनामुळे परिसरातील लोकांमध्ये मोठा सकारात्मक बदल घडून आलेला आहे.या तपपुर्ती सोहळ्याच्या निमित्ताने महाराजांनी आपला सामाजिक मानस बोलून दाखविला आहे की, सावत्रा व आजूबाजूच्या परिसरात मंदिराच्या माध्यमातून शक्य होतील तेवढे उत्तम सामाजिक कार्य आणि उपक्रम राबवून लोकांना चांगल्या सुख-सोयी देण्याचा त्यांचा संकल्प आहे. धार्मिक कार्यक्रमांची रूपरेषाया सोहळ्यामध्ये अखंड हरिनाम सप्ताह (दररोज सकाळी ७ ते ११), संगीत श्री रामचरितमानस कथा आणि त्रैदिनीय श्रीदत्तयाग (दि. ०८/१२ ते १०/१२) यांसारखे महत्त्वाचे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. समारोप आणि महाप्रसाद महोत्सवाची सांगता गुरुवार, ११ डिसेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात होणार आहे.या दिवशी सकाळी १०.०० ते दु. १२.०० वाजेपर्यंत रामायणाचार्य प.पु. दिगंबर स्वामी अमोलानंदजी महाराज गिरी यांच्या सुमधुर वाणीतून काल्याचे कीर्तन होणार आहे.समारोपाच्या दिवशी दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत भव्य नगर प्रदक्षिणा काढण्यात येईल, जे या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. याशिवाय, महोत्स वाच्या शेवटच्या दिवशी गुरुवार, ११ डिसेंबर २०२५ रोजी भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे (अन्न दान) आयोजन करण्यात आले आहे. (वेळः दुपारी २.०० ते ५.०० पर्यंत).